

आज दुसरी माळ
ब्रह्मचारिणी

| वर्ष - 9 | अंक -32 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 23 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


### आतील पानांत


- कोणाला मिळालं इम्पॅक्ट प्लेअर मेडल?
- पाकिस्तानचा आशियातून बाहेर?
- अहवाल सार्वजनिक करणे दुर्दैवी!
- चीनबरोबर संबंध सुधारण्याची इच्छा


## अजित पवार यांचा आढावा | ‘महामेट्रो’ व ‘एमएसआयडीसी’च्या अधिकाऱ्यांना सूचना

# मेट्रोसाठी भोसरीचा पूल पाडणार!

## तिथेच तीन मजली उड्डाणपूल; रामवाडी–वाघोलीसह विस्तारित मार्ग

| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**रामवाडी ते ते वाघोली (विठ्ठलवाडी) मेट्रो मार्ग आणि अहिल्यानगर महामार्ग एकत्रित करण्याबाबत पालकमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ‘महामेट्रो’ व ‘एमएसआयडीसी’च्या अधिकाऱ्यांना रविवारी सूचना दिल्या. या वेळी या मार्गासाठी अधिक निधी कसा उभा करायचा अथवा राज्य सरकारकडून घ्यायचा, या गोष्टीवर चर्चा झाली. मेट्रोच्या मंजूर व विस्तारित मार्गाबाबत मुंबईत अंतिम बैठक घेऊन निर्णय घेतला जाईल, असे पवार यांनी स्पष्ट केले.**



मेट्रोच्या विस्तारित मार्गाच्या अडचणी व कामांचा आढावा घेण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महामेट्रो, महाराष्ट्र पायाभूत सुविधा महामंडळ (एमएसआयडीसी), महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) अधिकारी यांच्यासोबत बैठक घेतली. या वेळी मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी पिंपरी-चिंचवड येथील भक्ती-शक्ती ते चाकण या मेट्रो मार्गाचे सादरीकरण केले; तसेच रामवाडी ते वाघोली, हडपसर ते लोणी काळभोर आणि हडपसर ते सासवड अशा विस्तारित मार्गांवर चर्चा झाली. रामवाडी ते वाघोली मार्गावर दुहेरी उड्डाणपूल बांधण्याचे निश्चित झाले आहे. त्यासाठी निधी कसा उभारायचा यावर देखील चर्चा झाली. या मार्गासाठी मेट्रोकडून आर्थिक नियोजन करण्यात आले आहे. इतर खर्च राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय), राज्य सरकारकडून उचलता येईल का, यावर चर्चा झाली. याबाबत सविस्तर चर्चा करून नियोजन करण्याच्या सूचना पवार यांनी दिल्या, महामेट्रोकडून प्रस्तावित हडपसर ते लोणी काळभोर आणि हडपसर ते सासवड मार्गावरदेखील ‘एमएसआरडीसी’ आणि ‘एनएचएआय’कडून काम केले जाणार आहे. त्याचे देखील एकत्रित नियोजन करून त्याचा आराखडा तयार करण्यास पवार यांनी सांगितले.

### ‘भोसरीचा पूल पाडावा लागणार...’

भोसरी येथे मेट्रोचे काम करताना आताचा चार पदरी पूल काढावा लागणार आहे. तिथे तीन मजली उड्डाणपूल बांधला जाणार आहे. पहिल्या मजल्यावर सहा पदरी रस्ता, दुसऱ्या मजल्यावर आठ पदरी रस्ता आणि तिसऱ्या मजल्यावर मेट्रो मार्ग असेल, असे अजित पवार यांनी सांगितले. फुगेवाडी येथील मेट्रोच्या कार्यालयात त्यांनी बैठक घेतली. गणेशोत्सवात मेट्रोच्या सेवेचा फायदा झाला. पुढील टप्प्यात चाकणपर्यंत मेट्रो नेली जात आहे. पुरंदर येथे होऊ घातलेल्या विमानतळावरून पुणे शहरात येण्यासाठी काही तरतूद करता येते का, याबाबत बैठकीत चर्चा केली. काही ठिकाणी बोगदे करावे लागणार आहेत. त्याबाबत पीएमआरडीए, पीडब्ल्यूडी, पीसीएमसी, पीएमसीसह एनएचएआय आणि रस्ते विकास महामंडळ मिळून पुढील १०० वर्षांचे नियोजन समोर ठेवून एकत्रितपणे कामे करण्यात येणार आहेत, असेही अजित पवार यांनी सांगितले.

**‘तळेगाव दाभाडेपर्यंत मेट्रोचे जाळे’**

पिंपरी-चिंचवडवासीयांसाठी लवकरच दुग्धशर्करा योग जुळून येणार असल्याची चिन्हे दिसत आहेत. पिंपरी ते शिवाजीनगर मार्गावर मेट्रो सुरू झाल्यानंतर पिंपरी ते निगडीपर्यंत मेट्रो मार्ग तयार करण्याचे काम सुरू आहे. त्यातच निगडीतील भक्ती-शक्ती चौक ते चाकणपर्यंत मेट्रो नेण्यात येणार असून, त्यासाठीचा ‘डीपीआर’ तयार करण्यात आला आहे. आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भक्ती-शक्ती चौक ते चाकण मेट्रो मार्गाचा विस्तार तळेगाव दाभाडेपर्यंत करता येईल का, याची पाहणी करा, अशा सूचना दिल्या आहेत. राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांच्यावर मेट्रोनं

प्रवास करण्याची वेळ, पाटलांना वाहतूक कोंडीचा फटका

**रामवाडी–वाघोली मेट्रोला वेग**

रामवाडी ते वाघोली (विठ्ठलवाडी) मेट्रो मार्ग आणि अहिल्यानगर महामार्ग एकत्रित करण्याबाबत सूचना देत पवार म्हणाले, “दुहेरी उड्डाणपूलासाठी अतिरिक्त निधी राज्य सरकारकडून किंवा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून मिळवता येईल का, यावर सविस्तर चर्चा करून नियोजन करा.” मुंबईत अंतिम बैठक घेऊन यावर निर्णय होणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

**तळेगावपर्यंत विस्ताराची शक्यता**

भक्ती-शक्ती चौक ते चाकण मेट्रो मार्गाचा विस्तार तळेगाव दाभाडेपर्यंत करता येईल का, याचा अभ्यास करण्याच्या सूचना पवार यांनी दिल्या. त्याचबरोबर हडपसर–लोणी काळभोर आणि हडपसर–सासवड मार्गांसाठी ‘एमएसआरडीसी’ व ‘एनएचएआय’ यांच्यातील कामांचे समन्वय साधण्याचा आराखडा तयार करण्याचे निर्देशही दिले.

**‘१०० वर्षांचे नियोजन समोर ठेवा’**

पुढील शंभर वर्षांचा विचार करूनच मेट्रोसह रस्ते, बोगदे आणि विमानतळ जोडणीचे नियोजन करा, असे पवार यांनी स्पष्ट केले. “गणेशोत्सवात मेट्रोचा प्रवाशांना मोठा फायदा झाला. पुढील टप्प्यात चाकण व पुरंदर विमानतळापर्यंत मेट्रोची जोडणी करण्याची तयारी आहे,” असे ते म्हणाले.

## पंचनामे करण्याची प्रक्रिया सुरू

## कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची माहिती

# शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात अतिवृष्टीमुळे ६६ लाख एकर क्षेत्राचे नुकसान झाले असून या नुकसानीचे पंचनामे करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यानुसार अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई दिली जाईल,' असे आश्वासन राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. संकटकाळात शेतकऱ्यांनी घाबरून जावू नये. राज्य सरकार शेतक-यांच्या पाठीशी आहे, असेही भरणे यांनी सांगितले.**

## ६६ लाख एकर क्षेत्राचे नुकसान



## नुकसानभरपाई दिली जाईल

'देशात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाला उच्चांकी दर देणाऱ्या साखर कारखान्यांच्या कामकाजाची माहिती घेऊन इतर साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांचा उसाला अधिकाधिक दर देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाला भाव, कामगारांना वेळेत वेतन, बोनस देणाऱ्या साखर कारखान्यांना राज्य शासनाच्यावतीने सहकार्य येईल,' असे भरणे यांनी स्पष्ट केले.ते म्हणाले, 'साखर व्यवसायात काम करीत असताना विविध अडअडचणी येत असतात.

द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनच्या ७० व्या वार्षिक अधिवेशन आणि साखर प्रदर्शनाच्या उद्घाटन दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार अभिजित पाटील, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकचे प्रशासक विद्याधर अनास्कर, सहकार आयुक्त दीपक तावरे, यशदाचे अतिरिक्त महासंचालक डॉ. शेखर गायकवाड, द वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष बी.बी. ठोंबरे, द साऊथ इंडियन शुगरकेन अँड शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष एन. चिनप्पन, द डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष एस. बी. भड, उपाध्यक्ष सोहन शिरगावकर यावेळी उपस्थित होते.'देशात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाला उच्चांकी दर देणाऱ्या साखर कारखान्यांच्या कामकाजाची माहिती घेऊन इतर साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांचा उसाला अधिकाधिक दर देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाला भाव, कामगारांना वेळेत वेतन, बोनस देणाऱ्या साखर कारखान्यांना राज्य शासनाच्यावतीने सहकार्य येईल,' असे भरणे यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, 'साखर व्यवसायात काम करीत असताना विविध अडअडचणी येत असतात. या अडचणीवर मात करण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या पाहिजे. या क्षेत्राच्या प्रगतीकरिता नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. नवीन वाण विकसित आणि त्या माध्यमातून अधिकाधिक ऊस उत्पादन तसेच साखरेचा उतारा वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. त्यादृष्टीने असोसिएशनने मार्गदर्शन केले पाहिजे.'

'राज्यातील साखर हा मोठा उद्योग आहे. देशाच्या प्रगतीत साखर उद्योगाच्या माध्यमातून आर्थिक क्रांती झाली आहे. साखर कारखान्यांनी एफआरपी आणि एमएसपी यांचा मेळ घालून व्यवसाय करावा. संचालक मंडळाने निर्णय घेतांना कारखान्याची आर्थिक परिस्थिती, उत्पादन, कामगाराचे वेतन, मुकादम, ऊसतोड कामगार, ऊस वाहतूक, उसदर आदी घटक विचारात घेऊन निर्णय घ्यावेत.' असे बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.

अनास्कर म्हणाले, 'साखर कारखान्यासाठी आर्थिक नियोजन महत्वपूर्ण असल्याने कारखान्यांनी व्यावसायिक उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून वाटचाल केली पाहिजे, याबाबत असोसिएशनने तांत्रिक बाबीसोबतच आर्थिक नियोजनाबाबतही आगामी काळात मार्गदर्शन केले पाहिजे, यासाठी सहकारी बँकेच्यावतीने सहकार्य करण्यात येईल.द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनच्या ७० व्या वार्षिक अधिवेशन आणि साखर प्रदर्शनाच्या उद्घाटन दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार अभिजित पाटील, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकचे प्रशासक विद्याधर अनास्कर, सहकार आयुक्त दीपक तावरे, मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष बी.बी. ठोंबरे, द साऊथ इंडियन शुगरकेन अँड शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष एन. चिनप्पन, द डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष एस. बी. भड, उपाध्यक्ष सोहन शिरगावकर यावेळी उपस्थित होते.

# शिवाजीनगरमधील पोलीस वसाहतीमध्ये दुर्गंधी

## मल:निस्सारण वाहिनी तुंबल्याने परिसरात सांडपाणी

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिवाजीनगर पोलीस वसाहतीच्या आवारात असलेल्या अधिकारी वसाहतीतील मल:निस्सारण वाहिनी तुंबल्याने आठवडापासून रहिवासी दुर्गंधीमुळे त्रस्त झाले आहेत. पोलीस वसाहतीतील रहिवाशांनी महापालिका, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार दिल्यानंतर अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्याने आरोग्याचा प्रश्न उपस्थित झाला आहे.**



गणेशखिंड रस्त्यावर शिवाजीनगर पोलीस मुख्यालयाच्या आवारात अधिकारी वसाहत आहेत. या वसाहतीत पाच इमारती असून, तेथे साधारणपणे १०० अधिकारी राहायला आहेत. पोलीस निरीक्षक, उपअधीक्षक,सहायक निरीक्षक दर्जाचे अधिकारी या वसाहतीत कुटुंबीयांसह राहायला आहेत. पुणे पोलीस दल, ग्रामीण, लोहमार्ग, राज्य गुन्हे अन्वेषण विभागातील (सीआयडी) अधिकारी वसाहतीत राहायला आहेत. वसाहतीची देखभाल, दुरुस्तीचे कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केली जातात. आठवडाभरापूर्वी वसाहतीतील मल:निस्सारण वाहिनी तुंबली. त्यामुळे वसाहतीत दुर्गंधी पसरली असल्याच्या तक्रारी वसाहतीत राहणाऱ्या अधिकाऱ्यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना केल्या.

याबाबत सार्वजिनक बांधकाम विभाग, महापालिकेकडे वेळोवेळी तक्रारही करण्यात आली. मात्र, अद्याप कोणीतही कार्यवाही झाली नाही. दुर्गंधीमुळे अधिकारी वसाहतीतील रहिवासी त्रस्त झाले आहेत. अधिकारी वर्ग दिवसभर कामात असतो. मात्र, कुटुंबीय आणि मुले दिवसभर घरी असतात. साचलेल्या पाण्यामुळे घाणेरडा वास येत असून, तळमजल्यावरील रहिवाशांना याचा अधिक त्रास होत आहे. याबाबत पोलीस मुख्यालयाच्या उपायुक्त राजलक्ष्मी शिवणकर यांच्याकडे तक्रार करण्यात आली. मात्र, अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नाही, असे अधिकारी वसाहतीतील रहिवाशांनी सांगितले.

**वाहतूक कोंडीला पर्यावरणपूरक पर्याय** नवीन मेट्रो सेवा सुरू करा

# किवळे - चतु:श्रृंगी मार्गावर स्वतंत्र मेट्रो सेवा द्या

## माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाढत्या वाहतूक कोंडीला पर्यावरणपूरक पर्याय म्हणून किवळे मुकाई चौक ते चतुःश्रृंगी या मार्गावर नवीन मेट्रो सेवा सुरू करण्याची मागणी माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**



- किवळे ते चतुःश्रृंगी स्वतंत्र मेट्रो मार्गाची मागणी
- वाढत्या लोकसंख्येचा विचार
- पर्यावरणपूरक व किफायतशीर प्रवास
- वाहतूक कोंडी व प्रदूषणावर उपाय
- उपमुख्यमंत्र्यांकडून सकारात्मक आश्वासन

अजित पवार यांच्या पुणे आणि पिंपरी-चिंचवड दौऱ्यादरम्यान भोंडवे यांनी ही मागणी मांडली. निवेदनात नमूद केले आहे की, रावेत, किवळे, पिंपळे सौदागर व आजूबाजूच्या परिसरात लोकसंख्येचा झपाट्याने वाढ होत आहे. येथे राहणारे बहुतांश नागरिक मध्यमवर्गीय आणि आयटी क्षेत्रात काम करणारे असल्याने त्यांना पुणे शहरात ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. स्वतःचे वाहन किंवा प्रवासी चारचाकी भाड्याने घेणे हेच सध्या पर्याय उपलब्ध आहेत. यामुळे वाहतूक कोंडी, प्रदूषण आणि आर्थिक भार वाढतो आहे. त्यामुळे या मार्गावर स्वतंत्र मेट्रो सेवा ही काळाची गरज बनली आहे, असे भोंडवे यांनी नमूद केले.

### प्रस्तावित मेट्रो स्थानके

चतुःश्रृंगी, औंध, सांगवी फाटा, पिंपळे निलख, पिंपळे सौदागर, जगताप डेअरी, काळेवाडी फाटा, १६ नंबर चौक, डांगे चौक, ताथवडे, पुनावळे, रावेत आणि किवळे मुकाई चौक अशी या मार्गावरील महत्त्वाची स्थानके असावीत अशी मागणी करण्यात आली आहे.

### उपमुख्यमंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या मागणीचा सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले असून, संबंधित प्रशासकीय विभागांशी चर्चा करून पुढील पावले लवकरच उचलली जातील असे त्यांनी सांगितले.

### नागरिकांकडून स्वागत

स्थानिक नागरिकांनी या प्रस्तावाचे स्वागत केले असून, वाहतूक कोंडी, इंधन खर्च आणि प्रदूषण यावर उपाय म्हणून ही मेट्रो सेवा अत्यंत आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले आहे. या मार्गाची अंमलबजावणी झाल्यास पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील हजारो प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

# मोदींच्या जीवनचरित्र माहितीपट व प्रदर्शनी व्हॅनचे उद्घाटन

## पिंपरी-चिंचवडमध्ये 'सेवा पंधरवडा'चे आयोजन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात सुरू असलेल्या 'सेवा पंधरवडा' अभियानांतर्गत पिंपरी-चिंचवड शहरात त्यांच्या जीवन प्रवासावर आधारित माहितीपट आणि विशेष प्रदर्शनीचे भव्य आयोजन करण्यात आले.**




सोमवार, २२ सप्टेंबर २०२५ रोजी पिंपरी येथील भाजप शहर मध्यवर्ती कार्यालयात या कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन झाले. या प्रसंगी भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार शंकर जगताप, आमदार उमाताई खापरे व माजी आमदार श्रीमती अश्विनी जगताप यांच्या हस्ते अत्याधुनिक एलईडी व्हॅनचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, मधुकर बच्चे, विकास डोळस, वैशाली खाडये, माजी प्रदेश सदस्य राजेश पिल्ले, संतोष कलाटे, माऊली थोरात, वरिष्ठ उपाध्यक्ष काळूराम बारणे, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव, शहर प्रवक्ते कुणाल लांडगे, अभियान संयोजक तुषार हिंगे, विनायक गायकवाड, संजय पटणी, राम वाकडकर, मंडल अध्यक्ष गणेश ढोरे, हर्षल नढे, सोमनाथ तापकीर, जयदीप खापरे, अजित बुर्डे, रामदास कुटे, माजी नगरसेवक संदीप कस्पटे, सुरेश भोईर, संदीप वाघेरे, राजू दुर्गे, रवींद्र देशपांडे, विठ्ठल भोईर, बिभीषन चौधरी, कैलास सानप, अभिजीत बोरसे, युवराज लांडे, गोरक्षनाथ झोळ, दत्ता झुळूक, सतीश नागरगोजे, सचिन राऊत, नंदू कदम, आल्हाट ताई, नीता कुशारे, प्रीतिंसिंह परदेशी, सीमा चव्हाण यांच्यासह अनेक आजी-माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंतप्रधान मोदींच्या जीवन चरित्रावर आधारित माहितीपट दाखवण्यात आला, ज्यामध्ये त्यांच्या बालपणातील संघर्षापासून ते गुजरातचे मुख्यमंत्री आणि नंतर भारताचे पंतप्रधान म्हणून त्यांनी घेतलेल्या धाडसी निर्णयांचा प्रवास उलगडण्यात आला. उपस्थितांनी या माहितीपटाचे कौतुक केले. यासोबतच, मोदींच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वाखाली देशाने विविध क्षेत्रांत केलेली प्रगती दर्शवणारी आकर्षक 'प्रदर्शनी' देखील सर्वांसाठी खुली करण्यात आली. यावेळी बोलताना आमदार शंकर जगताप म्हणाले, "पंतप्रधान मोदींच्या 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' या धोरणाने देशाचा चेहरामोहरा बदलला आहे. त्यांचे जीवन हे प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे. ही एलईडी व्हॅन आणि प्रदर्शनी पिंपरी-चिंचवडमधील प्रत्येक प्रभागात जाऊन जनतेला मोदींच्या कार्याची माहिती देईल." हे अभियान यशस्वी करण्यासाठी संयोजक तुषार हिंगे, विनायक गायकवाड आणि संजय पटणी यांनी विशेष मेहनत घेतली. ही एलईडी व्हॅन पुढील पंधरा दिवस शहराच्या विविध भागात फिरणार असून, जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत मोदींच्या जीवन आणि कार्याचा संदेश पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

# आरोग्यव्यवस्थेचे बदलते अर्थकारण



## भूमिका

**अगदी काही वर्षांपूर्वीपर्यंत मोठ्या शहरांमधील दवाखाने म्हणजेच तेथील रहिवाशांसाठी दैनंदिन आरोग्यसेवा हे गणित अगदी पक्के होते. काही गंभीर घडल्यावरच लोक रुग्णालयात जात. तेही बहुतांश वेळा ओळखीच्या, छोट्या रुग्णालयात जाण्यास प्राधान्य देत. आज अनेक ठिकाणी हे छोटे दवाखाने झपाट्याने नामशेष होत चाललेले दिसतात.**

महत्त्वाचे कारण म्हणजे आपल्या देशातील आरोग्याचे बदलते अर्थकारण आणि व्यवस्थापन. आपली शासकीय आरोग्य व्यवस्था अतिरुग्णभाराने त्रस्त झाली आहे. बालमृत्यू, मातामृत्यू, कुपोषण या समस्या आटोक्यात आणण्यात आपण थोडेबहुत यशस्वी होत असताना हृदयविकार, मधुमेह, कर्करोग, मानसिक आजार असे प्रदीर्घ काळ सोबत राहणारे आजार आता झपाट्याने वाढू लागले आहेत. नेमके याच काळात भारताच्या आरोग्य व्यवस्थेचे दोन महत्त्वाचे आधारस्तंभ दुबळे होताना दिसत आहेत. यातील पहिला म्हणजे शासकीय आरोग्य व्यवस्था. कारण प्राथमिक आरोग्य सेवा, उत्तम तालुका आणि जिल्हा रुग्णालये यासाठी आर्थिक आणि राजकीय पाठबळ अपुरे आहे. दुसरा आधारस्तंभ म्हणजे छोटे दवाखाने आणि रुग्णालये. अगदी आजही छोट्या शहरांमध्ये आणि ग्रामीण भागांत साधारणत: ७० ते ७५ टक्के रुग्णसेवा ही खासगी



यंत्रणा पुरवते. किंमत, गुणवत्ता, याबद्दल स्थानिक परिस्थितीनुसार मोठी तफावत आढळते हे खरे, पण तरीही ही रुग्णालये आणि दवाखाने आज आरोग्यव्यवस्थेचा मोठा भाग आहेत. त्यामुळे देशाची आरोग्य सेवा सशक्त करायची असेल तर या दवाखान्यांनाही सक्षम करणे गरजेचे आहे. मात्र देशात एक तिसरी शक्तिशाली यंत्रणा उदयास येते आहे, ती म्हणजे मोठमोठी रुग्णालये आणि त्यांच्याच कंपन्यांनी चालवलेले दवाखाने. सध्या तरी फक्त पाच टक्के लोकसंख्येलाच ते परवडू शकतात. प्रत्येक खासगी रुग्णालयाला त्यांच्याकडील १० टक्के खाटा गरीब रुग्णांसाठी राखून ठेवणे सक्तीचे असले तरी या नियमांची अंमलबजावणी क्वचितच होते. कारण खासगी रुग्णालयांना जास्तीत जास्त नफा कमवायचा असतो.शासनाच्या विमा आणि मदत योजनांची अपुरी आणि विलंबाने होणारी भरपाई आणि सरकारी यंत्रणेतील हेळसांड ही आणखी काही कारणे. केंद्र शासनाच्या ‘आयुष्मान भारत’ योजनेतील भरपाई शासनाकडून कित्येक महिने मिळत नसल्याच्या अनेक मोठ्या खासगी रुग्णालयांच्या तक्रारी आहेत. गावांमध्येही लोक खासगी दवाखान्यात जाणे पसंत करतात. कारण अनेक शासकीय रुग्णालयांत मिळणारी दुय्यम वागणूक, भ्रष्टाचार, आणि तुलनेने खासगी डॉक्टरकडे गेल्यावर ‘आपले कोणीतरी ऐकून घेते आहे’ हा विश्वास. पुढील काही वर्षांत मात्र हे छोटे दवाखाने अस्तित्वात राहतील का, हा प्रश्न आहे. भारतात होणाऱ्या या बदलांमागे आरोग्यसेवेची रचना हा मूलभूत मुद्दा आहे. उदारीकरणादरम्यान सार्वजनिक-खासगी सहभागातून आरोग्य व्यवस्था सशक्त करावी, अशी सूचना जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून होऊ लागली. भारतामध्ये खासगी आरोग्य यंत्रणांचा शिरकाव ३०-३५ वर्षांपूर्वी झाला होताच, पण आज त्याची वाटचाल झपाट्याने केंद्रीकरणाकडे चाललेली दिसते. गेली १५ वर्षे भारतातील उच्च-मध्यम वर्गाच्या क्रयशक्तीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या वर्गामध्ये आरोग्यविमा घेण्याचे प्रमाणही वाढू लागले असून तो मोठ्या रुग्णालयांना पसंती देत आहे. अनेक रुग्णालये चालवणाऱ्या मोठ्या कंपन्या आज बाह्यरुग्ण विभाग किंवा दवाखानेही चालवू लागल्या आहेत. आणि अगदी १५-२० वर्षांपूर्वीपर्यंत सर्रास आढळणारे छोटे दवाखाने आज जवळ जवळ लुप्त होत आहेत. छोटे दवाखाने बंद पडत असले, तरी आज खासगी आरोग्य क्षेत्रात प्रचंड प्रमाणात गुंतवणूक होते आहे. याचे कारण आरोग्य क्षेत्रात मिळू शकणारा अमाप नफा आणि त्याच्या तुलनेत कायद्यातील शिथिलता. आरोग्य आणि औषधी क्षेत्रात मुळातच माहिती आणि ज्ञानाची असमानता आहे. रुग्णालयात गेलेल्या रुग्णांना त्या चक्रातून बाहेर पडून स्वत:चे निर्णय घेता येणे अवघड जाते. अर्थात पूर्वी सगळे आलबेल चालले होते असे नाही. परंतु आज निव्वळ नफा कमावण्यासाठी हितसंबंधांचे एक जाळे तयार झालेले आहे आणि त्यातील गैरव्यवहार आणि आर्थिक नफा चक्रावून टाकणारा आहे.

## संपादकीय »

### ओढ ‘बॅलट’ची?

***आता ९० सदस्यांची विधानसभा भरेल आणि लोकनियुक्त सरकारही त्या प्रांतास मिळेल; तेव्हा केंद्राने आपली लुडबूड थांबवणे इष्ट..***

देशबांधवांकडून होणारी उपेक्षा, धर्म या योगायोगामुळे सतत घेतला जाणारा संशय, ‘कडे-कडे’ने जगणे नशिबी आल्याने निष्ठांबाबत निर्माण केले जाणारे प्रश्न या आणि अशा अन्य अनेक मुद्द्यांवरील नकारात्मकता आणि नैराश्य बाजूस सारत जम्मू-काश्मिरातील नागरिकांनी भरघोस मतदान केले ही हरखून जावे अशी बाब. त्या राज्यांतील मतदारांस आपल्या लोकशाही निष्ठा व्यक्त करण्याची ही संधी मिळाली याचे श्रेय सर्वोच्च न्यायालयाचे. मतदान शांततेत पार पाडल्यावर विजयी खुणा आणि मुद्रेद्वारे निवडणूक आयोग भले आपले ‘यश’ साजरे करत असेल. पण त्यास यासाठी भरीस घातले सर्वोच्च न्यायालयाने. हे न्यायालय कणखरपणे निवडणुकीचा आग्रह न धरते तर या राज्यांतील नागरिकांस अजूनही त्यापासून वंचित राहावे लागते. या राज्यातील मतदानाच्या शेवटच्या फेरीत जवळपास ६९.२१ टक्के इतके मतदान झाले.

“बुलेट’ला ओढ ‘बॅलट’ची?’ हा अग्रलेख (३ ऑक्टोबर) वाचला. निवडणूक निकालानंतर भाजपला अपेक्षित यश न मिळाल्यास जम्मू- कश्मीरमध्येही नायब राज्यपालांच्या अडून सत्तेची सर्व सूत्रे केंद्र सरकार आपल्या हातात ठेवेल यात शंका नाही. राजकीय विरोधकास नामोहरम करण्याचाही प्रयत्न होईल.

# काश्मीरला गरज सकारात्मक राजकारणाची

कुरघोडीच्या राजकारणास बळ मिळेल. तेथील तरुणांनाही देशातील इतर तरुणांप्रमाणे विकास, रोजगार, नोकऱ्या हव्या आहेत. तिथे निर्माण झालेले प्रश्न विकासाशी नव्हे, तर राजकारणाशी निगडित आहेत. काश्मीर प्रश्न चिघळण्यामागे आजवरच्या अनेक चुकीच्या राजकीय निर्णयांचा मोठा हातभार आहे. आज काश्मिरी जनता विकासाबरोबरच न्यायाच्याही प्रतीक्षेत आहे. विधानसभा निवडणुकीतील वाढलेल्या मतदानावरून हेच स्पष्ट होते. सरकारकडून कायम अन्याय होत असल्याची भावना आणि त्या भावनेला शेजारी राष्ट्राकडून दिली जात असलेली हवा यातून मोठ्या प्रमाणात असंतोष जन्म घेतो व त्यातून मोठ्या प्रमाणात हिंसा भडकते. निवडणुकीत कोण हरले, कोण जिंकले हा प्रश्न तुलनेने गौण ठरणार आहे. बॉम्ब आणि बंदुकीच्या धाकावर मात करत लोकशाहीचा विजय होणे ही बाब निवडणुकीतील निकालापेक्षा जास्त



महत्त्वाची ठरणार आहे. कश्मीरला लोकशाहीच्या मूळ प्रवाहात आणायचे असेल तर केंद्रातील भाजप सरकारने सत्ताकेंद्रित राजकारण न करता सकारात्मक राजकारण केले पाहिजे. भविष्यात कश्मीरमधील अनेक प्रश्नांची उत्तरे त्यातून मिळू शकतात.“बुलेट’ला ओढ ‘बॅलट’ची?’ हा अग्रलेख (३ ऑक्टोबर) वाचला. जम्मू व काश्मीर विधानसभेची पहिलीच निवडणूक शांततेत पार पडली याबद्दल केंद्र सरकार, सर्व पोलीस दले, लष्कर आणि स्थानिक प्रशासनाचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत. पण दहशतीच्या सावटाखाली जगणारे हे खोरे अनुच्छेद ३७० रद्द करून पाच वर्षे उलटल्यानंतर तरी विकासाच्या मुख्य प्रवाहात आले का? बाहेरील नागरिकांना जमीन खरेदीचा अधिकार मिळाला पण प्रत्यक्षात किती जमीन खरेदी झाली? उद्योगधंदे किती आले? यापैकी कोणत्याही प्रश्नाचे उत्तर सकारात्मक नाही.विकास ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. आजही तेथील तरुण फळे विकून गुजराण करतात आणि वृद्ध पशुपालन आणि दुग्ध विक्रीवर अवलंबून आहेत. ही परिस्थिती बदलणे अपेक्षित आहे. तेथील समाज विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी आधी त्या राज्यात स्थिर सरकार हवे. केंद्र सरकारनेही दरवेळेस सर्वोच्च न्यायालयाने कान टोचण्याची वाट पाहू नये. या भागात शांतता प्रस्थापित होणे देशाच्या राजकीय स्वास्थ्यासाठी आवश्यक ठरते.“बुलेट’ला ओढ ‘बॅलट’ची?’ हे संपादकीय वाचले. लोकशाहीत नागरिकांना मतदानाचा अधिकार आणि लोकनियुक्त सरकारपासून वंचित ठेवले तर सत्ताधाऱ्यांविरोधात असंतोष निर्माण होणे नैसर्गिक आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

मुसळधार पावसाची नोंद

अनेक गावांत पाणी शिरले, पिकांचे नुकसान

# सोलापूर जिल्ह्यात पावसाचा धुमाकूळ!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सोलापूर जिल्ह्यात काही ठिकाणी पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातल्याचे चित्र आहे. बार्शी, माढा, माळशिरस, पंढरपूर, अक्कलकोट या ठिकाणी मुसळधार पावसाची नोंद झाली आहे. काही ठिकाणी नदी नाले, ओढे भरून वाहू लागल्याने पाणी शेतात, रस्त्यावरून वाहत आहे. यामध्ये माढा तालुक्याला पुराचे संकट आहे. या पावसाने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.**

## पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान



सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी भागात यंदा जोरदार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे तेथील पिण्याच्या पाण्याचा, शेतीचा प्रश्न सुटला. मात्र, गेल्या आठ दिवसांत सतत पडणाऱ्या पावसाने शेतात पाणी साचल्याने हाताशी आलेले पीक पाण्यात वाहून गेले. बार्शी तालुक्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याची नोंद झाली आहे. तर माढा तालुक्यात देखील एकीकडे जोरदार पाऊस तर दुसरीकडे लगतच्या अहिल्यानगर, धाराशिव, पुणे जिल्ह्यातील धरणाचे पाणी सीना नदीत सोडल्याने या तालुक्याला आता पुराचे संकट आले आहे. अक्कलकोट तालुक्याला पुन्हा पावसाने झोडपून काढले आहे. अनेक ठिकाणी घरात पाणी शिरल्याच्या घटना घडल्या आहेत. तसेच शेतात पाणी साचले आहे. आता पाऊस थांबून कडक ऊन पडले तर शेतकऱ्यांना शेतात काम करता येणार आहे, अशी परिस्थिती झाली आहे. माळशिरस तालुक्यात देखील दमदार पावसाने हजेरी लावली. या पावसाने अकलूज-सांगोला रस्ता काही वेळासाठी बंद झाला होता. या रस्त्यावरून पाणी वाहत होते. पाणी ओसरल्यानंतर वाहतूक सुरळीत झाली.पंढरपूर तालुक्याला पावसाने चांगलेच झोडपले. सांगोला तालुक्यातील कटफळ येथून उगम पावणाऱ्या कासाळ ओढ्याला पूर आला आहे. यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. नागरी वस्तीसह शेतीपिकात पाणी शिरले आहे. महूद, आहीम, गारदी, पळशी, उपरी आदी गावांतील शेतकऱ्यांसमोर अस्मानी संकट उभे राहिले आहे. तर शहरात अनेक सखल भागात पाणी साचले आहे. लाखो रुपये खर्चून उपनगरात नव्याने डांबरी रस्ते करण्यात आले आहेत. या पावसाने अनेक ठिकाणी पाणी साचले तर वाहत्या पाण्याने खड्डे पडल्याचे चित्र आहे. आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी पावसाने नुकसान झालेल्या गावांना भेटी दिल्या. पंचनामे लवकर करावे अशा सूचना आमदार आवताडे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. दरम्यान, पुढील दोन दिवस पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी भागात यंदा जोरदार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे तेथील पिण्याच्या पाण्याचा, शेतीचा प्रश्न सुटला. मात्र, गेल्या आठ दिवसांत सतत पडणाऱ्या पावसाने शेतात पाणी साचल्याने हाताशी आलेले पीक पाण्यात वाहून गेले. बार्शी तालुक्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याची नोंद झाली आहे. तर माढा तालुक्यात देखील एकीकडे जोरदार पाऊस तर दुसरीकडे लगतच्या अहिल्यानगर, धाराशिव, पुणे जिल्ह्यातील धरणाचे पाणी सीना नदीत सोडल्याने या तालुक्याला आता पुराचे संकट आले आहे. अक्कलकोट तालुक्याला पुन्हा पावसाने झोडपून काढले आहे. अनेक ठिकाणी घरात पाणी शिरल्याच्या घटना घडल्या आहेत. तसेच शेतात पाणी साचले आहे. आता पाऊस थांबून कडक ऊन पडले तर शेतकऱ्यांना शेतात काम करता येणार आहे, अशी परिस्थिती झाली आहे. माळशिरस तालुक्यात देखील दमदार पावसाने हजेरी लावली. या पावसाने अकलूज-सांगोला रस्ता काही वेळासाठी बंद झाला होता. या रस्त्यावरून पाणी वाहत होते. पाणी ओसरल्यानंतर वाहतूक सुरळीत झाली.पंढरपूर तालुक्याला पावसाने चांगलेच झोडपले.

## पंढरपूरलाही झोडपले

सांगोला तालुक्यातील कटफळ येथून उगम पावणाऱ्या कासाळ ओढ्याला पूर आला आहे. यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. नागरी वस्तीसह शेतीपिकात पाणी शिरले आहे. महूद, आहीम, गारदी, पळशी, उपरी आदी गावांतील शेतकऱ्यांसमोर अस्मानी संकट उभे राहिले आहे. तर शहरात अनेक सखल भागात पाणी साचले आहे. लाखो रुपये खर्चून उपनगरात नव्याने डांबरी रस्ते करण्यात आले आहेत. या पावसाने अनेक ठिकाणी पाणी साचले.

# कृष्णा परिवाराचे कार्य प्रेरणादायी!

## समाजासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ – मंत्री जयकुमार रावल

।सातारा।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कृष्णा परिवाराने मागील पाच दशकांपासून अविरतपणे समाजातील सामान्य घटकाचे जीवनमान उंचावण्याचे कार्य केले आहे. कृष्णा परिवाराचे हे कार्य प्रेरणादायी असून, महाराष्ट्र आणि देशासाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहे, असे गौरवोद्गार राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री ना. जयकुमार रावल यांनी काढले.**




कराड : राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री ना. जयकुमार रावल यांचे स्वागत करताना कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले. बाजूस आ.डॉ. अतुलबाबा भोसले व विनायक भोसले.

कराड दौऱ्यावर आले असता ना. रावल यांनी कृष्णा कॅम्पसला भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते. राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री ना. जयकुमार रावल आज कराड दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी कृष्णा कॅम्पसला भेट देऊन, इथल्या कार्याची माहिती घेतली. कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी भाजपाचे जिल्हाध्यक्ष आमदार डॉ. अतुलबाबा भोसले व श्री. विनायक भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

ना. रावल त्यांनी कृष्णा विद्यापीठ व कृष्णा हॉस्पिटलमधील विविध विभागांना, तसेच कृष्णा बँक आणि कृष्णा सरिता बझारच्या कार्यालयांना भेट देऊन पाहणी केली. यावेळी बोलताना ते म्हणाले, आम्ही कृष्णा परिवाराचे नाव नेहमी ऐकत आलो आहोत, मात्र प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर त्यांच्या कार्याची व्याप्ती किती मोठी आहे हे जाणवले.

कृष्णा परिवाराने महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात अनन्यसाधारण व महत्त्वाचे कार्य केले आहे. एवढे विशाल विश्व उभे करणे सोपे नाही. हीच प्रेरणा घेऊन आम्ही आमच्या परिसरात काही निर्माण करू शकलो, तर ते आमच्यासाठी मोठे काम ठरेल.S

## विविध मान्यवर उपस्थित

यावेळी कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. एम. व्ही. घोरपडे, उपकुलसचिव एस. ए. माशाळकर, कृष्णा हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ. विजय कणसे, मेडिकल ॲडमिनिस्ट्रेटर डॉ. आर. जी. नानिवडेकर, कृष्णा फौंडेशनचे कार्यकारी संचालक प्रा.डॉ. विनोद बाबर, कृष्णा नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वैशाली मोहिते, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव जाधव, कृष्णा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भगवान जाधव यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

न्यायालयाचे खडेबोल

## विमान दुर्घटनेवरून सर्वोच्च न्यायालयाचे खडेबोल

# अहवाल सार्वजनिक करणे दुर्दैवी!

## जलद चौकशीची अपेक्षा केली व्यक्त



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अहमदाबाद येथे १२ जून रोजी 'एअर इंडिया'च्या विमान अपघातावरील प्राथमिक अहवाल प्रसिद्ध करणे दुर्दैवी आणि तितकेच बेजबाबदार कृत्य असल्याची टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केली. हे विमान दुर्घटनाग्रस्त होण्यास वैमानिक जबाबदार असल्याच्या प्रसार माध्यमांच्या दाव्यांना या अहवालामुळे बळ मिळाल्याचेही न्यायालयाने म्हटले. याप्रकरणी खंडपीठाने केंद्र सरकार आणि नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाला (डीजीसीए) नोटीस बजावत या अपघाताच्या स्वतंत्र, निष्पक्ष आणि जलद चौकशीची अपेक्षा व्यक्त केली.'**

अहमदाबाद येथील सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून १२ जून २०२५ रोजी 'एअर इंडिया'च्या विमानाने उड्डाण घेतल्यानंतर काही सेकंदांत ते कोसळले. या दुर्घटनेत २६० जणांचा मृत्यू झाला होता. विमान अपघाताची स्वतंत्र, न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या 'सेफ्टी मॅटर्स फाउंडेशन' या स्वयंसेवी संस्थेच्या जनहित याचिकेवर न्यायमूर्ती सूर्य कांत आणि एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठासमोर सोमवारी सुनावणी झाली. या वेळी 'विमान अपघात तपास ब्युरो'ने (एएआयबी) या अपघातप्रकरणी १२ जुलै रोजी जारी केलेल्या प्राथमिक अहवालातील काही पैलूंची दखल न्यायालयाने घेतली. हे अत्यंत दुर्दैवी आहे, अहवाल तुकड्या-तुकड्यांमध्ये जाहीर करण्याऐवजी, नियमित तपास तार्किक निष्कर्षापर्यंत पोहोचेपर्यंत गोपनीयता पाळली पाहिजे. यात पीडितांच्या गोपनीयतेचा आणि प्रतिष्ठेचा घटक असतो. म्हणूनच आपण अंतिम अहवालाची वाट पाहिली पाहिजे,' असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले. दरम्यान, याचिकाकर्त्यांची बाजू मांडणारे वकील प्रशांत भूषण यांनी यापूर्वी म्हटले होते की, 'अपघातासाठी वैमानिकांना जबाबदार धरणाऱ्या प्राथमिक अहवालातील एका ओळीमुळे जगभरातील माध्यमांमध्ये एक कथानक तयार झाले. परंतु 'जोपर्यंत लोकांना अपघाताचे कारण माहीत नाही तोपर्यंत ते जाहीर करणे धोक्याचे आहे. अपघाताला १०० दिवसांहून अधिक काळ लोटला आहे आणि आम्हाला अजूनही कारणे माहीत नाहीत.'घटनेची नियमित चौकशी तार्किक निष्कर्षापर्यंत पोहोचेपर्यंत आपण माहिती तुकड्या-तुकड्याने जाहीर करू नये. त्यात अत्यंत गुप्तता पाळणे आवश्यक आहे. त्यानंतरच आपण अपघाताचे खरे कारण काय होते, हे सांगू शकतो. – अफवा, अनुमान आदींना आळा घालण्यासाठी तसेच माध्यमे,

### अहवालाची वाट पाहिली पाहिजे

दरम्यान, याचिकाकर्त्यांची बाजू मांडणारे वकील प्रशांत भूषण यांनी यापूर्वी म्हटले होते की, 'अपघातासाठी वैमानिकांना जबाबदार धरणाऱ्या प्राथमिक अहवालातील एका ओळीमुळे जगभरातील माध्यमांमध्ये एक कथानक तयार झाले. परंतु 'जोपर्यंत लोकांना अपघाताचे कारण माहीत नाही तोपर्यंत ते जाहीर करणे धोक्याचे आहे. अपघाताला १०० दिवसांहून अधिक काळ लोटला आहे आणि आम्हाला अजूनही कारणे माहीत नाहीत.

समाजमाध्यमांमध्ये किंवा इतर माध्यमांमध्ये निवडक माहिती प्रसारित होणे टाळण्यासाठी अशा घटनांची चौकशी त्वरित झाली पाहिजे. जेव्हा अशाप्रकारचा अपघात होतो, तेव्हा संबंधित विमान प्रवासी वाहतूक कंपनीलाच दोषी ठरवले जाते. बोईंग किंवा एअरबसला दोष दिला जात नाही. त्यामुळेच विमान कंपनी उद्ध्वस्त होऊ शकते. माध्यमे बेजबाबदारपणे वृत्तांकन करतात. अशा घटनांत गोपनीयता महत्त्वाची आहे. अहमदाबाद येथील सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून १२ जून २०२५ रोजी 'एअर इंडिया'च्या विमानाने उड्डाण घेतल्यानंतर काही सेकंदांत ते कोसळले. या दुर्घटनेत २६० जणांचा मृत्यू झाला होता. विमान अपघाताची स्वतंत्र, न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या 'सेफ्टी मॅटर्स फाउंडेशन' या स्वयंसेवी संस्थेच्या जनहित याचिकेवर न्यायमूर्ती सूर्य कांत आणि एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठासमोर सोमवारी सुनावणी झाली. या वेळी 'विमान अपघात तपास ब्युरो'ने (एएआयबी) या अपघातप्रकरणी १२ जुलै रोजी जारी केलेल्या प्राथमिक अहवालातील काही पैलूंची दखल न्यायालयाने घेतली.हे अत्यंत दुर्दैवी आहे, करण्याऐवजी, नियमित तपास तार्किक निष्कर्षापर्यंत पोहोचेपर्यंत गोपनीयता पाळली पाहिजे. यात पीडितांच्या गोपनीयतेचा आणि प्रतिष्ठेचा घटक असतो. आपण अंतिम अहवालाची वाट पाहिली पाहिजे.

# चीनबरोबर लष्करी संबंध सुधारण्याची इच्छा

## अमेरिकी लोकप्रतिनिधींच्या चीनच्या दौऱ्यात गरज व्यक्त



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेला चीनबरोबर लष्करी संबंध सुधारण्याची इच्छा असल्याचे मत अमेरिकेच्या खासदाराने व्यक्त केले आहे. ॲडम स्मिथ यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ चीनच्या दौऱ्यावर गेले असून, या शिष्टमंडळाने चीनच्या संरक्षणमंत्र्यांबरोबर झालेल्या भेटीत ही अपेक्षा व्यक्त केली.**

अमेरिकेच्या लोकनियुक्त प्रतिनिधींनी चीनला दिलेली २०१९ नंतरची ही प्रथमच भेट आहे. अमेरिकेच्या सिनेटरनी २०२३ मध्ये बीजिंगला भेट दिली होती. व्यापार, तंत्रज्ञान आणि जागतिक अस्थिरतेच्या काळातील ही भेट महत्त्वाची मानली जात आहे. शिष्टमंडळाने चीनचे संरक्षणमंत्री डाँग जून यांची भेट घेतली. तसेच, उपपंतप्रधान ही लाइफेंग यांचीही भेट घेतली. शिष्टमंडळाने रविवारी चीनचे पंतप्रधान ली छिआंग यांचीही भेट घेतली.स्मिथ म्हणाले, 'दोन्ही देशांमधील संवादयंत्रणा अधिक खुली करण्याची अमेरिकेची इच्छा असून, विशेष करून दोन्ही देशांतील संरक्षण यंत्रणेतील संवाद भक्कम होण्याची गरज आहे.

चीन आणि अमेरिकेला जागतिक शांतता आणि सुरक्षा हवी आहे. त्यामुळे संवादयंत्रणा खुली असण्याची गरज आहे. यावर खुली चर्चा करून परस्परांमधील मतभेद दूर करावेत.'वॉशिंग्टन : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प 'टिकटॉक'बरोबरील कराराला कार्यकारी आदेशाद्वारे या आठवड्याअखेर मान्यता देण्याची शक्यता आहे. हाउसमधील अधिकाऱ्याच्या हवाल्याने हे वृत्त दिले आहे. या कराराला मान्यता दिल्यास अमेरिका-चीनमध्ये काही महिने सुरू असलेल्या चर्चेला यश येणार आहे.

### 'टिकटॉक' करार लवकरच?

अमेरिका आणि चीनने या करारासंदर्भात प्रगती केली असून, 'टिकटॉक'ची अमेरिकी मत्ता अमेरिकी मालकांना देण्यास चीन राजी झाल्याची माहिती ट्रम्प यांनी दिली आहे. या आठवड्याअखेर हा करार होण्याची शक्यता आहे. 'टिकटॉक' आणि 'व्हाइट हाउस'ने यावर अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही.अमेरिकेला चीनबरोबर लष्करी संबंध सुधारण्याची इच्छा असल्याचे मत अमेरिकेच्या खासदाराने व्यक्त केले आहे.

# नवरात्रौत्सवाचे आध्यात्मिक आणि धार्मिक महत्त्व!

## नवरात्रातील घट हे गर्भाचं प्रतीक...

दिव्य अशा नऊ रूपांची पूजा या नऊ दिवसांत करतात. स्त्रीला प्राप्त असलेली अद्भुत शक्ती म्हणजे ती गर्भ धारण करू शकते. बीज रूप असलेल्या गर्भास अन्न पाणी देऊन त्याचं पोषण करते. नवरात्रातील घट हे गर्भाचं प्रतीक आहे. सर्जनाचा हा उत्सव आहे. आदिशक्ती जगदंबा ही संपूर्ण विश्वामधली मातृ शक्ती, जननी, पालनकर्ती आहे. शरीरामध्ये वसलेल्या चक्रांवर तिची सत्ता आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसांत तिची नऊ स्वरूपांत पूजा होते. प्रथम शैलपुत्री ही पर्वतकन्या असून ती वृषभावर आरूढ झालेली आहे. ही दिव्य स्वरूप असून तिच्या आराधनेमुळे सर्व रोगांचं हरण होतं. द्वितीय ब्रह्मचारिणी ही पार्वती आहे. ती श्वेतवस्त्रा असून हातात कमंडलू व जपमाळ धारण केली आहे. ही वैराग्याचं प्रतीक आहे. स्वाधिष्ठान चक्रावर हिची सत्ता आहे. माता चंद्रघंटा ही सुवर्ण वर्ण असून तिनं अर्धचंद्र धारण केला आहे. ती अष्टभुजा, शस्त्रधारिणी आहे.चतुर्थ रूप आहे माता कुष्मांडा. जिच्या स्मित हास्यापासून ब्रह्मांड उत्पन्न झालं आहे. ही पुनरुत्पादन आणि नवनिर्मितीची देवता आहे. पंचम रूप स्कंदमाता ही कार्तिकेय माता आहे. ही ज्ञानस्वरूप आहे. सिंहारूढ आहे. षष्ठ रूप माता कात्यायनी. ही मातृस्वरूप आहे. स्त्रीच्या ठायी असलेली संगोपन करण्याची क्षमता हिच्या पूजनानं प्राप्त होते. कालरात्री ही कालस्वरुपिणी असून, विश्रांतीचं प्रतीक आहे. साक्षात् काल हिच्या ठायी वास करतो. हे देवीचं सातवं स्वरूप आहे. उग्र् रूप असलं तरीही शुभंकर आहे.अष्टम रूप म्हणजे महागौरी. गौरवर्ण, मुक्त केशा अशी ही माता ज्ञान आणि शांततेचं प्रतीक आहे. ही सौम्य रूपा आहे. आईचं नववं रूप म्हणजे सिद्धीदात्री. हिच्या पूजनानं साधकाला अष्ट सिद्धी प्राप्त होतात. तेज आणि सात्विक वृत्तीची जोपासना होते. ही कमलासना आहे. सौम्य रूप आहे. नवरात्रीमध्ये ब्रह्मांड शक्ती ही जागृत अवस्थेत असते. या काळात स्त्रियांनी केलेली व्रत पूजा ही अतिशय फलदायी ठरते, असं म्हणतात. तसंच या दिवसांत देवीला नवविध रंगांची फुलं, वस्त्रं, आभूषणं आदी अर्पण केली जातात. आठवड्यातील प्रत्येक वाराप्रमाणे परिधान केलेली वस्त्रं नवग्रहांच्या शुभ लहरी जागृत करतात, असं मानलं जातं. चंद्राचा रंग शुभ्र, मंगळाचा रक्त वर्ण, बुधाचा हरित, गुरूचा पिवळा, शुक्राचा गुलाबी तर शनीचा राखाडी असे रंग परिधान करावे, असं सांगतात. महाराष्ट्रात साडेतीन शक्तीपीठं आहेत.



## आपली संस्कृती ही मातृपूजन संस्कृती

महाराष्ट्राची कुलदेवता तुळजा भवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी, माहूरची श्री रेणुका माता आणि वणीची श्री सप्तशृंगी. हा स्त्री शक्तीचा जागर करण्याचा काल आहे .शुंभ-निशुंभ, रक्तबीज, महिषासुर आदी राक्षसांना मारून आदिमाया विश्रांती घेते. या काळात जगदंबेची उपासना लोक विविध प्रकारे करतात. घटस्थापना, अखंड दीप, माला बंधन, नऊ दिवस उपवास, तसेच श्री सप्तशती पठण, नवचंडी हवन बळी, देवीचा गोंधळ, जागरण इत्यादी प्रथा-परंपरा दिसून येतात. या नऊ दिवसात कुमारिका पूजनाचं विशेष महत्त्व आहे. महानवमीला या उत्सवाचं पारणं होतं. दसऱ्याला माता सिंहारूढ होऊन सीमोल्लंघन करते आणि या उत्सवाचा समारोप होतो. काया वाचा मने शुद्ध राहून हे नऊ दिवस अंबेचा जागर करावा. मनातील सात्विक भाव जागृत करावे आणि शरीरशुद्धी करावी. या काळात सर्वसामान्य स्त्रीच्या ठायी सुद्धा एक प्रकारचं तेज निर्माण होतं. आपली संस्कृती ही मातृपूजन करणारी आहे, स्त्रीला सन्मान देणारी आहे. स्त्रीनंसुद्धा स्वतःचं अस्तित्व, सत्व जपून दुष्ट शक्तींचा नाश करावा, हेच प्रथांचं सार मानता येईल. आई जगदंबा तिच्या सर्व भक्तांना आशीर्वचन देऊन सुख समृद्धी, तेज आणि अन्यायाशी लढण्याची शक्ती प्रदान करो, हीच तिच्या चरणी प्रार्थना. आई जगदंबेचा उदो उदो...

**नवरात्रीचे वेध लागलेल्या स्त्रीवर्गातच नव्हे, तर सगळ्यांमध्येच उत्साह आणि चैतन्य खेळत असताना काय आहे नवरात्रीचं आध्यात्मिक आणि धार्मिक दृष्टीने महत्त्व...पितृपक्ष संपत येतो. वातावरण किंचित तापू लागतं. हवेमध्ये अजुनही थोडा थोडा पावसाळी ओलेपणा शिल्लक असतो. शरद ऋतूची चाहुल लागते. कधीतरी उत्तररात्री उशिरा आकाशाकडे नजर टाकली तर चांदणं दिसतं. खूप सुंदर दिवस असतात ते अणि रात्री त्याहून अधिक देखण्या. मग येतो अश्विन. अश्विन शुद्ध प्रतिपदा- घटस्थापना. आपल्याकडे खूप महत्त्व असलेलं शारदीय नवरात्र. ईश तत्त्व हे स्त्री रुपात अत्यंत मोहक, रम्य वाटतं. ही देवी अयोनी संभवा आहे, भक्त वत्सला आहे, मातृरूपिणी आहे. तिच्या सौंदर्याचं वर्णन करायला शब्द अपुरे आहेत. पण ती शस्त्रास्त्र धारण करणारीही आहे. दुष्टांचं निर्दालन करणारी आहे. शक्तीची पूजा अनादी काळापासून चालत आली आहे. जेव्हा असूर भयंकर माजले, तेव्हा ब्रह्मा, विष्णु, महेश यांच्या एकत्रित शक्तीपासून दुर्गा जन्मली. तिनं महिषासूर राक्षसाला मारून महिषासुरमर्दिनी हे नाव धारण केलं.**





इम्पॅक्ट प्लेअर मेडल

## तिलक वर्मा ड्रेसिंग रूममध्ये पाया पडला?

# वर्माला मिळालं इम्पॅक्ट प्लेअर मेडल?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताने आशिया चषक सामन्यात पाकिस्तानचा पराभव करत सुपर फोर टप्प्याला दणक्यात सुरूवात केली. पाकिस्तानने दिलेल्या १७२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने १८.५ षटकांत सहज विजय मिळवला. भारतीय गोलंदाजांची कामगिरी या सामन्यात सुरूवातीला साधारण राहिली. पण अखेरीस त्यांनी पुनरागमन करत पाकिस्तानला फार मोठी धावसंख्या उभारू दिली नाही. या सामन्यानंतर आता बीसीसीआयने इम्पॅक्ट प्लेअर मेडल देतानाचा व्हीडिओ शेअर केला आहे.**

## व्हीडिओ बीसीसीआयने शेअर केला



पाकिस्तानने दिलेल्या १७२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अभिषेक शर्मा आणि शुबमन गिलने कमालीची सुरूवात केली. या दोन्ही सलामीवीरांनी पहिल्या विकेटसाठी १०५ धावांची भागीदारी रचली. अभिषेक ७४ धावांची खेळी केली. तर शुबमन ४७ धावांवर बाद झाल्याने अवघ्या ३ धावांसाठी त्याचं अर्धशतक हुकलं. यानंतर सूर्यकुमार यादव खातं न उघडता बाद झाला.संजू सॅमसनही १३ धावा करत बाद झाला. यानंतर हार्दिक पंड्याने तिलक वर्माला चांगली साथ दिली आणि भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.तिलक वर्माने या सामन्यात महत्त्वाच्या क्षणी मोठे फटके खेळत भारताच्या विजयाचा मार्ग मोकळा केला. तिलकने षटकार आणि चौकार लगावत १९व्या षटकातच सामना जिंकून दिला. तिलकने १९ चेंडूत २ चौकार आणि २ षटकारांसह ३० धावांची प्रभावी खेळी केली. तिलक वर्माच्या प्रभावी खेळीसह त्याला भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याचं इम्पॅक्ट प्लेअर मेडल देण्यात आलं. बीसीसीआयने आशिया चषकातील सर्व सामन्यांनंतर प्लेअर ऑफ द मॅच मेडल देण्याची जबाबदारी सर्व सपोर्ट स्टाफला दिली आहे, जो खूप कौतुकास्पद निर्णय आहे. त्यामुळे या सामन्यात भारताच्या कोचिंग स्टाफमधील महत्त्वाचा भाग असलेला रघू याने मेडल दिलं.रघू राघवेंद्र हा भारताच्या खेम्यातील थ्रोडाउन स्पेशालिस्ट आहे आणि गेली अनेक वर्ष तो भारतीय संघाचा भाग आहे. रघू हा कर्नाटकातील कुमटा येथील आहे.

लहानपणापासूनच त्यांना क्रिकेटची विशेष आवड होती. २००८ मध्ये त्यांना बीसीसीआयने टीम इंडियाचा थ्रो डाऊन एक्सपर्ट म्हणून संघात संधी दिली आणि तेव्हापासून ते संघाचा भाग आहेत. रघूने इम्पॅक्ट प्लेअर मेडलचा विजेता घोषित करण्यापूर्वी प्रेरणादायी भाषण दिलं. त्याचं भाषण ऐकून टीम इंडियातील सर्वांनी त्याचं कौतुक केलं.

## टीम इंडियाचा थ्रो डाऊन

रघू राघवेंद्र हा भारताच्या खेम्यातील थ्रोडाऊन स्पेशालिस्ट आहे आणि गेली अनेक वर्ष तो भारतीय संघाचा भाग आहे. रघू हा कर्नाटकातील कुमटा येथील आहे. लहानपणापासूनच त्यांना क्रिकेटची विशेष आवड होती. २००८ मध्ये त्यांना बीसीसीआयने टीम इंडियाचा थ्रो डाऊन एक्सपर्ट म्हणून संघात संधी दिली आणि तेव्हापासून ते संघाचा भाग आहेत.

यानंतर त्याने तिलक वर्माचं नाव घेत त्याला मेडल घेण्यासाठी बोलावलं. तिलकने येताच मजेत खाली वाकून त्याच्या पाया पडला आणि मग मेडल स्वीकारलं.पाकिस्तानने दिलेल्या १७२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अभिषेक शर्मा आणि शुबमन गिलने कमालीची सुरूवात केली. या दोन्ही सलामीवीरांनी पहिल्या विकेटसाठी १०५ धावांची भागीदारी रचली. अभिषेक ७४ धावांची खेळी केली.

तर शुबमन ४७ धावांवर बाद झाल्याने अवघ्या ३ धावांसाठी त्याचं अर्धशतक हुकलं. यानंतर सूर्यकुमार यादव खातं न उघडता बाद झाला.संजू सॅमसनही १३ धावा करत बाद झाला. यानंतर हार्दिक पंड्याने तिलक वर्माला चांगली साथ दिली आणि भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.तिलक वर्माने या सामन्यात महत्त्वाच्या क्षणी मोठे फटके खेळत भारताच्या विजयाचा मार्ग मोकळा केला. तिलकने षटकार आणि चौकार लगावत १९व्या षटकातच सामना जिंकून दिला. तिलकने १९ चेंडूत २ चौकार आणि २ षटकारांसह ३० धावांची प्रभावी खेळी केली. तिलक वर्माच्या प्रभावी खेळीसह त्याला भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याचं इम्पॅक्ट प्लेअर मेडल देण्यात आलं. बीसीसीआयने आशिया चषकातील सर्व सामन्यांनंतर प्लेअर ऑफ द मॅच मेडल देण्याची जबाबदारी सर्व सपोर्ट स्टाफला दिली आहे, जो खूप कौतुकास्पद निर्णय आहे. त्यामुळे या सामन्यात भारताच्या कोचिंग स्टाफमधील महत्त्वाचा भाग असलेला रघू याने मेडल दिलं.

# पाकिस्तानचा आशियातून होऊ शकतो बाहेर

## भारताविरुद्धचा पराभव महागात पडणार, फायनलचं समीकरण?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ मधील सुपर फोर टप्प्याला सुरूवात झाली. भारतीय संघाने पाकिस्तानला पराभूत करत विजयासह या मोहिमेला सुरूवात केली आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने सुपर फोरमधील सामन्यातही पाकिस्तानचा ६ विकेट्सने सहज पराभव केला. अभिषेक शर्मा भारताच्या विजयाचा नायक ठरला. पण या पराभवानंतर पाकिस्तानचा संघ आशिया चषक स्पर्धेतून बाहेर पडू शकतो.**




भारत, पाकिस्तान, बांगलादेश आणि श्रीलंका हे संघ सुपर फोरसाठी पात्र ठरले आहेत. सुपर फोरमध्ये प्रत्येक संघ ३-३ सामने खेळणार आहे आणि सुपर फोरच्या गुणतालिकेत टॉप-२ संघ थेट अंतिम फेरीसाठी पात्र होतील. भारताचा पुढील सुपर फोर सामना २४ सप्टेंबरला बांगलादेशविरुद्ध होईल. या सामन्यात भारतीय संघाने विजय मिळवल्यास संघाचं अंतिम फेरीतील स्थान निश्चित होईल, तर दोन दिवसांनी त्यांचा सामना श्रीलंकेविरूद्ध होईल.तर दुसरीकडे, भारताकडून

## पुढचा सामना जिंकावा लागेल

बांगलादेश दोघांनीही त्यांचे सुरुवातीचे सामने जिंकले आहेत. तर श्रीलंका आणि पाकिस्तान अनुक्रमे तिसऱ्या आणि चौथ्या स्थानावर आहेत.जर सलमान आघाचा संघ श्रीलंकेविरुद्ध पराभूत झाला तर त्यांचा प्रवास जवळजवळ संपेल कारण त्यानंतर अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी पाकिस्तानला बांगलादेशविरुद्धचा पुढचा सामना जिंकावा लागेल.

झालेल्या दारुण पराभवानंतर पाकिस्तानच्या अंतिम फेरीच्या संधी आणखी कमी झाल्या आहेत. अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी पाकिस्तानला आता केवळ बांगलादेश आणि श्रीलंकेविरुद्ध विजय मिळवावा लागणार नाही, तर मोठ्या फरकाने विजय मिळवत गुणतालिकेत चांगला नेट रन रेट असणं महत्त्वाचं आहे.२३ सप्टेंबरला पाकिस्तानचा सामना श्रीलंकेशी होईल. दोन्ही संघांनी त्यांचे सुपर फोरमधील पहिले सामने गमावले. त्यामुळे श्रीलंका यांच्यातील एका संघाच्या पराभवामुळे त्यांचे आशिया चषकातील अभियान जवळजवळ संपुष्टात येईल.

स्मार्ट PCMC
महाईन्यूज™
ePaper
। मंगळवार ।
। दि. 23 सप्टेंबर 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित आंतरमहाविद्यालयीन टेबल टेनिस

# 'डी. वाय. पाटील' अभियांत्रिकी महाविद्यालयाचा टेबल टेनिस संघ सलग तिसऱ्यांदा अजिंक्य!

### शिक्षण विश्व: नामांकित 27 महाविद्यालयांच्या संघांशी लढत देत पटकाविले अजिंक्यपद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, आकुर्डी येथील टेबल टेनिस संघाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित आंतरमहाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा अजिंक्यपद पटकावले आहे. राज्यातील नामांकित २७ महाविद्यालयांच्या संघांशी लढत देत, डीवायपीसीओईच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत स्पर्धेवर आपली छाप सोडली.**



या तिसऱ्या सलग विजयामुळे महाविद्यालयाने स्पर्धेतील सातत्य, टीमवर्क आणि जिद्दीचा उत्कृष्ट नमुना सादर केला आहे. या कामगिरीमुळे डी. वाय. पाटील महाविद्यालयाचे नाव विद्यापीठ स्तरावर क्रीडा क्षेत्रात विशेषतः टेबल टेनिसमध्ये अत्युच्च स्थानावर पोहोचले आहे.

प्रणव पाटील – आर.एन.ए.,राज कोठारी – आय.टी., अमन शर्मा – ईएनटीसी, आदित्य लाटकर – मेकॅनिकल शंतनू निरफळे – ईएनटीसी विजयी संघातील खेळाडू आहेत.

संघाने संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट समन्वय राखत, सामन्यांमध्ये आत्मविश्वासाने खेळ करत विजय संपादन केला. प्रत्येक खेळाडूने संघासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. या संघाच्या यशामध्ये त्यांचे कठोर प्रशिक्षण, समर्पण आणि महाविद्यालयाच्या पाठबळाचा मोठा वाटा आहे. या उल्लेखनीय कामगिरीनंतर दोन खेळाडू, प्रणव पाटील आणि राज कोठारी यांची तीन दिवसांच्या आंतर-झोनल प्रशिक्षण शिबिरासाठी निवड झाली आहे. हे दोघेही यानंतर आंतर-झोनल स्पर्धेत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतील.

महाविद्यालयाचे क्रीडा संचालक आबाजी माने यांनी संघाचे अभिनंदन करताना सांगितले की, "या यशामागे खेळाडूंची अथक मेहनत आणि महाविद्यालयाचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन आहे. हे यश संपूर्ण महाविद्यालयासाठी गौरवाचे क्षण घेऊन आले आहे."

या ऐतिहासिक विजयानंतर महाविद्यालयात आनंदाचे वातावरण असून, सर्व स्तरातून संघाचे कौतुक होत आहे. आगामी स्पर्धांमध्येही संघ असेच यश मिळवेल, अशी अपेक्षा ट्रस्टी तेजस पाटील, प्रिन्सिपल पी मलाठी, डायरेक्टर अमित विक्रम, आबाजी माने यांनी व्यक्त केली आहे.

## विद्यार्थ्यांनी घेतले सायबर सुरक्षेचे धडे!

### शिक्षण विश्व: फिशिंगपासून पासवर्डपर्यंत उपक्रमातून सायबर सुरक्षा मार्गदर्शन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आजच्या डिजिटल युगात इंटरनेटचा वापर अपरिहार्य बाब बनली आहे. मोबाईल, संगणक व इंटरनेटच्या माध्यमातून शिक्षणासोबतच मनोरंजन, संवाद साधणे इत्यादी गोष्टी होत असतात. परंतु याचाच गैरफायदा घेऊन सायबर गुन्हेगार आपल्याला जाळ्यात ओढू शकतात, म्हणूनच सायबर सुरक्षा याविषयी जागृती करणे आवश्यक आहे.**




एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी व क्विक हील फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने "सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा" हा उपक्रम २ ऑगस्ट २०२५ पासून सुरू करण्यात आला असून, विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रभावी पावले उचलली जात आहेत. या अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी शिवप्रसाद जाधव आणि आयुष इचे यांची सायबर वॉरियर्स म्हणून निवड झाली असून, त्यांनी परिसरातील विविध शाळांमध्ये जाऊन फिशिंग, ऑनलाईन फसवणूक, सोशल मीडियावरील वैयक्तिक माहितीचा गैरवापर, सुरक्षित पासवर्ड पद्धती व इंटरनेटचा जबाबदार वापर यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सादरीकरण व संवादात्मक सत्रे घेतली आहेत. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक अमित ताळे (एमआयटी कॉलेज) व अजय शिरके (क्विक हील फाउंडेशन) यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवला जात आहे. आतापर्यंत जि.परिषद प्राथमिक शाळा चिंबळी, शारदाबाई पवार विद्यालय आंबेगव्हाण, श्री ज्ञान साई शिक्षण प्रसारक मंडळ आळंदी देवाची, जि. परिषद प्राथमिक शाळा खेड, ज्ञानभक्ती इंटरनॅशनल स्कूल डुडूळगाव,मोशन क्लासेस मोशी. तसेच परिसरातील आणखी अनेक शाळांमध्ये कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत. या कार्यशाळांमध्ये विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचा सुरक्षित वापर कसा करावा, फिशिंग म्हणजे काय, मजबूत पासवर्ड कसा तयार करावा, ऑनलाइन फसवणुकीपासून कसे वाचावे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

## जागतिक स्तरावर तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला अनेक संधी उपलब्ध

# भारत उत्सव 2025 मध्ये पुण्याचा ठसा...

## पुण्याचे हर्षल सुरुशे आणि विनायक काळे यांची मलेशियातही उल्लेखनीय कामगिरी..!





। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**अखिल लोककला सांस्कृतिक संघटना, पुणे यांच्या वतीने १६ ते २२ मे दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या "भारत उत्सव – २०२५" या अखिल भारतीय नाट्य, संगीत व नृत्य महोत्सवात पुण्यातील दोन युवा कलाकारांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

पुण्याचे हर्षल सुरुशे आणि विनायक काळे या कलाकारांनी जोडी नृत्य – आधुनिक शैली प्रकारात उत्कृष्ट नृत्याविष्कार सादर करत द्वितीय क्रमांक पटकावला. देशभरातून आलेल्या नामांकित कलाकारांच्या स्पर्धेत त्यांनी केलेले सादरीकरण विशेष ठरले. या महोत्सवाचे आयोजन "नववा सांस्कृतिक मंच" या व्यासपीठासाठी करण्यात आले होते. राष्ट्रीय स्तरावर मिळवलेल्या या यशानंतर हर्षल आणि विनायक यांनी भारतीय नृत्यकला जागतिक पातळीवर पोहोचवली. नुकत्याच मलेशियातील क्वालालंपूर येथे पार पडलेल्या "रिदम ॲण्ड एक्स्प्रेशन वर्ल्ड फेस्ट – २०२५" या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत त्यांनी जोडी नृत्य – लोकनृत्य शैली प्रकारात भारताचे प्रतिनिधित्व करत द्वितीय पारितोषिक पटकावले. भारतीय सांस्कृतिक वारसा सादर करून त्यांनी जागतिक व्यासपीठावर प्रेक्षकांची वाहवा मिळवली. या दोन्ही कलाकारांना मार्गदर्शन प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शक रॉकी सॅम्युअल, पवन चंद्रगिरी आणि गोकुळ यांनी केले. हर्षल सुरुशे आणि विनायक काळे यांच्या या यशाबद्दल शहरभरातून कौतुक होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## मास्टर माईंड स्कूलमध्ये शारदीय नवरात्रोत्सवाची सुरुवात



**आज शाळेत नवरात्रोत्सवाचा पहिला दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. आजची पहिली माळ शैलपुत्री देवी उपासनेचा पांढरा रंग असल्यामुळे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पांढऱ्या रंगाचे कपडे परिधान केले होते.शाळेत सर्वप्रथम सकाळी देवीची पूजा करण्यात आली. विद्यार्थ्यांनी वंदना गीत सादर करून वातावरण पवित्र केले. शाळेतील शिक्षकांनी नवरात्रीचे महत्त्व व या सणातून मिळणारा संदेश याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संपूर्ण शाळेत भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरण होते.**

Pune District Education Association's
# Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy
Saswad, Pune - 412301

D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:

- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your Application Now!



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad

Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)

Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046